CNR - **MHKO130008432023**

**शुभांगी जयवंत कुंभार विरुध्द जयवंत रघुनाथ कुंभार वगैरे**

## महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा अर्ज क्र. २३/२०२३ मधील अर्ज निशाणी क्र. ५ वर आदेश पारीत

१. सदरचा अर्ज अर्जदार हिने तिला अंतरीम पोटगी मिळण्याकरीता वि.प.क्र.१ यांच्याविरुध्द दाखल केला आहे.

२. अर्जदार यांच्या कथनानुसार, अर्जदार यांचा वि.प.क्र. १ यांचेसोबत दिनांक १५/०४/२००८ इ. रोजी हिंदू धर्म–शास्त्र व रितीरिवाजानुसार अर्जदार यांचे घरी रा.शाहुनगर, शिंदेवाडी, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे विवाह झालेला आहे. सदर लग्नाचा खर्च, मानपान हा अर्जदार यांचे आई–वडीलांनी केला असून अर्जदार ही वि.प.क्र. १ ची कायदेशीर पत्नी आहे. तर अर्जदार यांचे वि.प.क्र. २ या सासू व वि.प.क्र. ३ हे दिर आहेत. सदरचे लग्नानंतर सुरवातीचे काही दिवस तिला चांगल्या प्रकारे नांदविण्यात आले मात्र् त्यानंतर पहिल्या दिवाळीच्या सणामध्ये वि.प.क्र. १ हे वि.प.क्र. २ व ३ यांच्या सांगणेवरून अर्जदाराकडे २ तोळे सोन्याच्या चेनसाठी मागणी केली, ती पुर्ण न झालेने अर्जदारास मारहाण, शिवीगाळ करून "माहेरून सोने घेवून परत ये" असे म्हणून माहेरी पाठवले. अर्जदारांच्या आईवडीलांची आर्थिक परिस्थिती बिकट असुनही त्यांनी वरील मागणी पुर्ण करुन अर्जदारास सासरी नांदवणेस पाठवले.

३. वि.प.क्र. १ यांना दारुचे व्यसन असुन त्यांनी अर्जदाराने घराबाहेर पडु नये अशी बधंने घातली. वि.प.क्र. १ हे कामावर गेल्यानंतर वि.प.क्र. २ व ३ हे अर्जदारांना नोकरासारखे राबवत होते. अर्जदारांच्याकडून घरातील सर्व कामे वि.प. करून घेत. वि.प.क्र. २ या अर्जदारांना टोमणे मारून भांडण तंटा करत असत. तरी वि.प. यांचेकडून होणारा त्रास अर्जदार या कोणालाही न सांगता सहन करून राहू लागल्या.

४. अर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, वि.प.क्र. १ यांनी अर्जदार यांना कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय भांडण काढून जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवणेस मारहाण करणे सुरू केले. सदरचा वि.प. यांचा होणारा मानसिक, शारीरिक त्रास सहन करणे अर्जदार यांना कठीण होवू लागले, असे असतानाही नाईलाजास्तव अर्जदार हे वि.प. यांचेसोबत त्रास सहन करून संसार करणेचा प्रयत्न करू लागल्या. त्यानंतर कोणत्याही कारणाशिवाय वि.प.क्र. १ यांनी अर्जदार यांचेवर व वि.प.क्र. २ यांच्यावर चारित्र्यावर संशय

घेणे सुरु केले.

५. दरम्यानचे कालावधीमध्ये अर्जदार यांना वि.प.क्र. १ यांचेपासून दिनांक ०७/०७/२००९ इ. रोजी दिग्वीजय नावाचा मुलगा झाला. सदर बाळाच्या जन्मावेळी वि.प. यांना दवाखान्याचा खर्च द्यावा लागतो म्हणून "हा मुलगा माझा नाही" असे म्हणून वि.प.क्र. १ तेथून पळून गेले. सदर दवाखान्याचा सर्व खर्च अर्जदार यांचे आई–वडिलांनी कर्ज काढून भरला. वि.प.क्र. १ यांनी दवाखान्यातून पळ काढल्यामुळे नाईलाजास्तव अर्जदार यांना बाळासोबत आपले माहेरी राहावे लागले.

६. अर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, त्यानंतर एका वर्षाने वि.प.क्र. १ हे वि.प.क्र. २ व ३ यांना घेवून अर्जदार यांचे माहेरी घरी रा. शाहुनगर, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे आले व पंचासमक्ष आश्वासन देत अर्जदार यांचेसोबत व्यवस्थित संसार करतो असे सांगून अर्जदार यांना घरी घेवून गेले. दिनांक १३/११/२०११ इ. रोजी वि.प.क्र. १ यांचेपासून अर्जदार यांना यशराज नावाचा मुलगा झाला. त्यावेळी देखील "हा मुलगा माझा नाही" असे म्हणत वि.प.क्र. १ यांनी अर्जदार यांना परत मारहाण, शिवीगाळ चालू केली. वि.प.क्र. १ हा सर्व प्रकार वि.प.क्र. २ व ३ यांचे सांगणेवरून निव्वळ अर्जदार यांना शारिरीक व मानसिक त्रास देणेकरीता करीत होते. वि.प.क्र. १ यांनी कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय दिनांक ०३/०२/२०१५ इ. रोजी वि.प.क्र. १ घरी येवून अर्जदार यांना शिवीगाळ व मारहाण केली. दुस–या दिवशी दिनांक ०४/०२/२०१५ इ. रोजी अर्जदार यांचे भाऊ विक्रम हे भेटायला आल्यांनतर त्यांना देखील वि.प.क्र. १ यांनी मारहाण केली अर्जदारांना व त्यांचे भाऊ विक्रम यांना "परत माझ्या घरी पाय ठेवायचा नाही" असे म्हणत शिवीगाळ करत नेसत्या वस्त्रानिशी अर्जदारांना घराबाहेर काढले व दोन्ही मुले स्वत:जवळ ठेवून घेतली.

७. सदरची घटना घडल्यानंतर एका महिन्यानंतर वि.प.क्र. १ यांनी शेजारील बाईसोबत पळून जावून विवाह केला. हे खात्रीशिररीत्या अर्जदार यांना समजले आहे. यावरून वि.प.क्र. १ यांना अर्जदारांसोबत संसार करायची मानसिकता नव्हती असे कथन केले आहे.

८. वरीलप्रमाणे परिस्थिती असताना, यातील अर्जदार यांनी वि.प.क्र. १ यांना दिनांक १५/०५/२०२३ इ. रोजी आपले वकीलांच्यामार्फत नोटीस पाठविलेली आहे. सदर नोटीसीस यातील वि.प.क्र. १ यांनी त्यांचे वकील विजय कृष्णा मस्के यांचेमार्फत

उत्तर दिलेले आहे. सदर नोटीसीचे उत्तरातील वि.प.क्र. १ यांचा मजकूर खोटा, चूकीचा व लबाडीचा आहे. सन २०१५ नंतर गेली ८ वर्षामध्ये वि.प. हे अर्जदारांना नांदावयास घेवून जाण्यासाठी आले नाही. अर्जदार यांची जबाबदारी, संगोपन, दैनंदिन खर्चाची जबाबदारी पूर्णपणे झटकलेली आहे. यातील वि.प. हे करत असलेल्या नोकरीमधून दरमहा रु. ३०,०००/– कमवितात. वि.प. हे श्रीमंत आहेत व वि.प. यांची किणी वाठार गावी भरपूर शेतजमीन असून सदर शेतजमिनीपासून वार्षिक रू. १०,००,०००/– उत्पन्न मिळते. वि.प. यांचे किणी वाठार गावी मोठे घर आहे. वि.प. हे दरवर्षी गणपतीच्या सणामध्ये मूर्ती तयार करणे, विकणेचा व्यवसाय स्वतःच्या घरी करतात. त्यातून त्यांना दरवर्षी रक्कम रूपये ५,००,०००/– मिळते. या उत्पन्नावर वि.प. व वि.प.क्र. १ यांनी केलेल्या दुसऱ्या लग्नाच्या पत्नीसह ऐशोआरामात जीवन जगत आहेत. वि.प.क्र. १ यांनी अर्जदार यांची कोणत्याही प्रकारची कपडेलत्ता, औषधपाणी अगर चरितार्थाची व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हे स्वतःचा चरितार्थ करणेस असमर्थ आहेत.

९. अर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, सदरचा अर्ज चालून अंतिम निकाल होणेस बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानचे कालावधीमध्ये अर्जदार यांचे उदरनिर्वाहाकरीता, औषधपाण्याकरीता, निवासाकरीता आर्थिक रक्कमेची आवश्यकता आहे. त्यामुळे तत्काळ आर्थिक मदत वि.प. यांचेकडून मिळावी. अर्जदार यांची सर्व जबाबदारी सर्वस्वी वि.प. यांचेवर आहे. वि.प. यांचे स्वतःचे मालकीचे घर आहे. अर्जदार यांना स्वतःचा खर्च व राहणीमानाकरीता दरमहा रक्कम रू.१५,०००/– इतकी पोटगी कायमपणे देण्याबाबत मागणी केली. अर्जदार यांना राहणेची सोय म्हणून वि.प. यांच्या मालकीची घरामध्ये राहणेची सोय करावी अथवा त्याबाबत अडचण निर्माण झालेस सोयीचे समतोलत्व म्हणून अर्जदार यांना अन्य ठिकाणी रहिवासाकरीता घरभाडे व अन्य सोयीकरीता म्हणून दरमहा रु. ५,०००/– इतकी रक्कम व वि.प. यांना अर्जदार यांच्या आईवडीलांनी घातलेले अर्ध्या अर्ध्या तोळ्याच्या २ सोन्याच्या अंगठ्या वि.प. यांनी अर्जदार यांना देणेबाबत आदेश होणेविषयी विनंती केली आहे.

१०. वि.प. यांनी मुख्य अर्जास व अंतरिम पोटगीचे अर्जास निशाणी क्र. १३ नुसार म्हणणे दाखल केले. वि.प. यांना अर्जदारासोबत झालेला विवाह त्यांना असलेली दोन अपत्य आणि आजतागायत अर्जदारांशी असलेले नातेसंबंध या बाबी मान्य केल्या असून उर्वरीत सर्व अर्जदारांची कथने नाकारली आहेत.

११. वि.प. यांच्या पुढील कथनानुसार, त्यांचा विवाह अर्जदार यांचे गावी झाला

असला तरी सदर विवाहाचा संपुर्ण खर्च वि.प. व त्यांचे घरचे लोकांनी केलेला आहे. अर्जदार हिला तिच्या आई–वडीलांनी कोणतेही दागिने घातलेले नाहीत. निव्वळ मणीमंगळसुत्र व शालुकरीता रक्कम रुपये एक हजार दिलेले आहेत. याव्यतिरीक्त अर्जदार व तिच्या घरच्या लोकांनी कोणताही व कसलाही खर्च केलेला नाही. लग्नानंतर अर्जदार हिने कधीही नियमित व व्यवस्थित संसार केला नाही. अर्जदार या सतत कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्जदार यांचेशी भांडणतंटा करुन माहेरी निघून जातात. अर्जदार या कु. दिग्वीजय व कु.यशराज यांची देखील आजतागायत कोणतीही जबाबदारी घेतलेली नाही. अर्जदार या कशाबशा कु. दिग्वीजय हा सहा वर्षाचा होईपर्यंत आणि कु.यशराज हा चार वर्षाचा होईपर्यंत वि.प.क्र. १ यांचेसोबत नांदल्या आहेत. त्यानंतर दि. ०४/०२/२०१५ इ. रोजी कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय माहेरी निघून गेल्या आहेत, त्या आजतागायत वि.प. यांच्याकडे नांदायला आलेल्या नाहीत. अर्जदार यांनी वि.प.क्र. १ यांचा कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय त्याग करुन वि.प.क्र. १ यांना वैवाहिक जीवनापासून वंचित ठेवून वि.प.क्र. १ यांचा मानसिक व शारिरीक छळ केलेला आहे.

१२. वि.प. यांच्या पुढील कथनानुसार, अर्जदार या बहिणीच्या लग्नाकरीता माहेरी गेल्या असता, सदरचा विवाह आटोपून दिनांक ०४/०२/२०१५ इ. रोजी तिचा भाऊ विक्रम याच्यासोबत अर्जदार यांच्या घरी आले होते. परंतु त्यादिवशी अर्जदार व तिचा भाऊ विक्रम हा ३ ते ४ गुंडप्रवृत्तीच्या लोकांना घेवून वि.प.क्र. १ यांना दमदाटी करुन त्यांना मारहाण केली व दोन्ही मुले कु. दिग्वीजय व कु.यशराज यांना टाकुन सर्व दागिने घेवुन माहेरी निघुन गेली. उलट वि.प.क्र. १ यांचेवरच अर्जदार यांनी पेठवडगांव पोलीस स्टेशन येथे खोटी तक्रार दिली आहे. अर्जदार हिने वि.प.क्र. १ यांचेसोबत आजतागायत कधीही प्रामाणिकपणे नांदायचा प्रयत्न केलेला नाही. याउलट वि.प.क्र. १ यांनी वेळोवेळी अर्जदार यांना फोन करुन व त्यांना व त्यांचे घरचे लोकांना प्रत्यक्ष भेटून नांदायला येणेबाबत बऱ्याचदा विनंती केली होती, परंतु अर्जदार कधीही वि.प.क्र. १ यांचेकडे कधीही नांदायला आलेली नाही.

१३. वि.प.क्र. १ यांना अर्जदार यांचेसोबत संसार करणेची प्रामाणिक इच्छा असलेने वि.प.क्र. १ यांनी दिनांक १२/०७/२०१८ इ.रोजी दिलासा सामाजिक विश्वस्त संस्था, कोल्हापूर यांचेकडे अर्जदार यांनी नांदायला येणेबाबत अर्ज केला होता. सदर विश्वस्त संस्थेठिकाणी अर्जदार या ५ वेळेस तडजोडीस आल्या होत्या, परंतु कोणत्याही प्रकारची तडजोड करुन नांदायला येण्याची इच्छा व तयारी दाखविली नाही व नांदायला

येण्यास स्पष्टपणे नकार दिला. वि.प.क्र. १ यांनी अर्जदार व वि.प.क्र. १ यांचे लग्नातील मध्यस्थ श्री.बजरंग कुंभार यांचेमार्फत देखील अर्जदार यांना नांदायला येण्याबाबत विनंती केली होती. तसेच अर्जदार यांचे मामा श्री.मलकु कुंभार आणि अर्जदार यांचे नातेवाईक श्री.श्रीकांत कुंभार (निवृत्त पोलीस अधिकारी) यांनी देखील अर्जदार व वि.प.क्र. १ यांचेदरम्यान तडजोड करुन अर्जदार यांना वि.प.क्र. १ यांचेकडे नांदायला पाठविणेबाबत प्रयत्न केला होता. परंतु अर्जदार यांनी कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय वि.प.क्र. १ यांचेसोबत संसार करणेस स्पष्टपणे नकार दिला आहे.

१४. सन २०१५ नंतर अर्जदार या आजतागायत सासरी परत आलेल्या नाहीत. शिवाय अर्जदार हिने कधीही दोन्ही मुलांची चौकशी, विचारपूस केलेली नाही. अर्जदार हिला स्वच्छंद आयुष्य जगण्याची सवय आहे. अर्जदार हिने कधीही संसारिक जबाबदारी स्विकारलेली नाही, उलट वि.प.क्र. १ व त्यांचे घरचे लोकांचेवर खोटे आरोप करुन स्वतःचे बेजबाबदार कृत्य लपवण्याकरीता प्रस्तुतच्या खोट्या अर्जाची रचना केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या अर्जाचेकामी अर्जदार ही कोणतीही दाद मागणेस पात्र नाही. अर्जदार या श्री बाळूमामा एग्रो प्रोड्युसर कंपनी, मु.पो.आदमापुर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथे नोकरीस आहेत. त्यांना रक्कम रुपये १०,०००/– इतका पगार आहे. अर्जदार स्वतःचा सांभाळ स्वतः करत आहेत. अर्जदार यांच्यावर मुलांची अथवा कोणतीही कौटूंबिक जबाबदारी आजअखेर नाही. त्यामुळे अर्जदार यांना कोणतीही आर्थिक सहाय्याची आवश्यकता याअगोदरही नव्हती व आजही नाही. याउलट वि.प.क्र. १ ते एम.आय.डी.सी. शिरोली येथे फौंड्रीमध्ये नोकरीस आहेत, त्यांना जेमतेम रक्कम रुपये १०,०००/– इतका पगार आहे. सदर पगारावर वि.प.क्र. १ हे स्वतःचे, दोन्ही मुलांचे पालनपोषण, शिक्षण तसेच यातील वि.प.क्र. २ त्यांची वयोवृध्द आई यांचे औषधोपचार, सेवासुश्रुषा इत्यादीचा सर्व खर्च अवलंबून आहे. वि.प. यांना त्यांच्या मुळगांवी कोणतीही शेती नसून त्याबाबतचा मजकुर अर्जदार यांनी खोटेपणाने नमुद केलेला आहे. वि.प.क्र. १ हे कसेबसे त्यांच्या पगारातून मुलांचा, त्यांच्या आईचा व स्वतःचा आजतागायत उदरनिर्वाह चालवत आहेत.

१५. वि.प. यांच्या पुढील कथनानुसार, वि.प. यांनी अर्जदार यांच्या दोन्ही प्रसुतीचा खर्च सोसला असुन दोन्ही मुलांची देखभाल केली आहे. अर्जदाराने गेल्या ८ वर्षापेक्षा जास्त कालावधीपर्यंत वि.प.क्र. १ यांचा कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय त्याग केलेला आहे व वि.प.क्र. १ यांना वैवाहिक जीवनापासून वंचित ठेवलेले आहे. तसेच दोन्ही मुलांची जबाबदारी देखील झटकलेली आहे. या अर्जाचेकामी मुलांच्या अंतरिम ताबा अथवा

मुलांना भेटणेबाबत देखील अर्जदार यांनी अर्जात कोणतीही दाद मागितलेली नाही, यावरुन अर्जदार यांचा हेतू स्वच्छ नसून प्रस्तुत वि.प.क्र. १ यांना कु. दिग्वीजय व कु.यशराज यांच्या भवितव्याच्या दृष्टीने अर्जदार यांचेसोबत प्रामाणिकपणे संसार करणेची तयारी व इच्छा आहे वि.प.क्र. १ हे त्यांना घेवून जाणेस तयार आहेत. वरील सर्व परिस्थितीचा व वस्तुस्थितीचा विचार होवून अर्जदार यांचा मुळ अर्ज व अंतरीम पोटगी अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा अशी नम्र विनंती केली आहे.

**उभय पक्षांचा युक्तिवादः–**

१६. अर्जदाराच्या विद्वान विधीज्ञांनी अर्जास अनुसरुन असा युक्तीवाद केला की, कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय वि.प.क्र. १ ने अर्जदाराचा त्याग केला आहे. सद्यस्थितीस वि.प. हे नोकरीस असून त्यास दरमहा रक्कम रु.३०,०००/- वेतन मिळते. वि.प.क्र. १ यांची किणी वाठार गावी भरपूर शेतजमिन मिळकत असून, शेत मिळकतीमधून वार्षिक अंदाजे १० लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच वि.प. यांचे किणी वाठार गावी मोठे घर आहे व वि.प. हे दरवर्षी गणपतीच्या सणामध्ये मूर्ती तयार करणे, विकणेचा व्यवसाय स्वतःच्या घरी करतात व त्यातून त्यांना दरवर्षी अंदाजे ५ लाख रुपये उत्पन्न मिळते. अर्जदार ही तिच्या माहेरी शिंदेवाडी (शाहूनगर) येथे दिनांक ०४/०२/२०१५ पासून राहत असून तिला उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. शिवाय अर्जदाराच्या कथनाला पुष्टी देण्याकरीता तिने तिचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले असुन वि.प. याने त्यांना उदरनिर्वाहासाठी कोणतीही रक्कम दिल्याचे दर्शविले नाही. तसेच वि.प.ने त्यांच्यावर असलेल्या जबाबदारीचे व संपत्तीचे प्रतिज्ञापत्र दिले नसल्यामुळे, अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. शिवाय, मुख्य अर्जास दिनावधी लागण्याची शक्यता असल्याने अर्जदाराने मागणी केल्यानुसार पोटगी देण्यास वि.प. सक्षम असुन, विनंतीप्रमाणे अर्ज मंजुर करण्याचा युक्तीवाद केला.

१७. वि.प.चे विव्दान विधीज्ञ युक्तिवादाकरीता गैरहजर राहिले. त्यामुळे सदर अर्जास वि.प.तर्फे दिलेला लेखी जबाब युक्तिवाद म्हणून ग्राहय धरण्यात आला.

**– कारणमिमांसा –**

१८. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले. अर्ज व अर्जाच्या म्हणण्याचे अवलोकन केले. अर्जदार आणि वि.प. यांचा विवाह आज ही कायम असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. तसेच त्यांना दोन मुले असल्याची बाब अर्जदार व वि.प. यांना मान्य आहे. दोन्ही मुले सद्यस्थितीत वि.प.क्र. १ यांच्याकडे वास्तव्यास आहेत. वरील बाब लक्षात घेता, तसेच

मुख्य अर्जास व अंतरिम पोटगीचे अर्जास निशाणी क्र. १३ नुसार वि.प. यांचा विस्तृत जबाब लक्षात घेता, प्रकरणात पुरावा होवून अर्ज निकाली निघण्यास काही अंशी कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१९. वि.प.यांच्या कथनानुसार, अर्जदार ही शिंदेवाडी (शाहूनगर) येथे दिनांक ०४/०२/२०१५ पासून वेगळी राहत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. तसेच अर्जदार ही कमावण्यास सक्षम असल्याचे वि.प. यांचा बचाव आजघडीस दिसून येतो. तसेच वि.प.यांनी अर्जदार ही कमावण्यास सक्षम असल्याचा अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे कागदपत्रांचे पुराव्याअभावी जसेच्या तसे वाचन करणे आजघडीस न्यायोचित होणार नाही. तसेच वि.प.यांनी ते एम.आय.डी.सी., शिरोली येथे फौंड्रीमध्ये नोकरी करतात याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. परंतु वि.प. यांना दरमहा रक्कम रुपये १०,०००/- इतके वेतन असल्याचे मान्य केले आहे. तसेच अर्जदार यांनी वि.प. यांची एकत्रित कुंटुंबाची शेतजमिन असलेबाबत अभिलेखावर ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. अर्जदारांच्या उत्पन्नाबाबत वि.प. यांनी कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे वि.प.च्या केवळ तोंडी कथनास आजरोजी पुराव्याअभावी महत्व प्राप्त होत नाही. आजघडीस अर्जदार ही तिचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे असेही पुराव्याअभावी ठरविणे ही उचित होणार नाही. त्यामुळे तिचे माहेरी शिंदेवाडी (शाहूनगर) येथे राहण्याचे कारण हे मुळ अर्जाच्या गुणवत्तेवर निकाली निघण्यास पात्र आहे. सद्यस्थितीत, वि.प.ने तिला काही आर्थिक मदत दिली असे दाखवण्याकरीता अभिलेखावर कोणतेही दस्त दाखल केले नाहीत.

२०. अंतरिम पोटगीची रक्कम ठरविताना न्यायालयाने ती अशा प्रकारे ठरविणे आवश्यक आहे की, अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र व्यक्तींना भटके व हालअपेष्टेचे तसेच भोग विलासी जीवन जगण्यास मज्जाव करेल. अर्जदाराच्या प्रतिज्ञापत्रावरुन प्रथमदर्शनी तिची निर्वाहाबाबत वि.प.यांनी व्यवस्था केल्याचे दिसून येत नाही. शिवाय, वि.प.ने अर्जदारास उदरनिर्वाहाकरीता नियमित काही रक्कम दिली असल्याचे आजघडीस दर्शवले नाही. आई व मुलां सारखे पत्नीचा सांभाळ करणे हे वि.प. यांचे प्राथमिक नैतिक कर्तव्य आहे.

२१. वि.प.क्र. १ व अर्जदार यांचा राहणीमानाचा व सामाजिक दर्जा, त्यांच्या कामाचे स्वरुप, वि.प.क्र. १ कडे असलेल्या दोन्ही मुलांचे शिक्षणाचे वय व शैक्षणिक खर्च, वि.प. यास मिळणारे व मान्य असलेले वेतन, तसेच महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून

संरक्षण कायदा या कलमाचे उद्दिष्ट आणि वि.प.क्र. १ पासून अर्जदार वेगळे राहत असल्याचा कालावधी या संपुर्ण बाबी विचारात घेता, अर्जदारास रक्कम रुपये ४०००/– अशी तात्पुरती अन्न, वस्त्राची रक्कम दरमहा मंजूर करणे व ही रक्कम वि.प.क्र. १ यांनी सदरचा अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार यांना दयावी असे आदेशित करणे उचित होईल. अर्जदारा ही सन २०१५ पासुन तिच्या आई–वडीलांकडे राहत असल्याचे दिसुन येत असुन तिने सदरचा अर्ज सन २०२३ ला केला आहे. त्यामुळे तिला आजघडीस रहिवाशीची नितांत गरज असल्याचेही दिसून येत नाही. आज घडीस सोन्याच्या दागीण्या संदर्भात अर्जदाराने उचीत पुरावा न दिलेमुळे तसेस रहिवासाची नितांत आवश्यकता असले बाबत अभिलेखावर संयुक्तीक पुरावा न दिलेमुळे रहिवास व सोन्याचे दागीणे परत देण्याकरीता ची विनंती तुर्तास मंजूर करणेत येत नाही. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**–: आदेश :–**

१. अर्जदाराची अंतरिम पोटगीची विनंती अशंतः मंजुर करण्यात येते.

२. वि.प.क्र. १ याने अंतरीम अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये ४०००/– अशी अंतरिम पोटगी पुढील आदेशापर्यंत दर महिन्याच्या पाच तारखेपूर्वी नियमित दयावी.

३. रहिवासाची विनंती व सोन्याचे दागिने परत करणेची विनंती तुर्तास मंजूर करणेत येत नाही.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

GORE BHASKAR DEVIDAS
Digitally signed by GORE BHASKAR DEVIDAS
Date: 2024.04.16 18:03:23 +0530

कागल (बी.डी.गोरे)

दिनांकः– १०/०४/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

कोर्ट क्र. १, कागल.